नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक १६/०५/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

**१) पो.स्टे. मौदा** :— दिनांक १५/०५/२०२२ चे ०१.२५ वा.दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी श्री मुख्तार बागवान कामठी विभाग कामठी हे पो.स्टे. मौदा स्टाफसह जिल्हा गस्त करीत असतांना मौदा बस स्टाप जवळ एमच—३१/एफसी—२४१९ क्रमांकाचा ट्रक हा अवैधरित्या विना परवाना रेतीची वाहतुक करतांना मिळुन आला. ट्रक मधील चालक आरोपी क्र— १) रवी शंकर मेश्राम, वय ३२ वर्ष, रा. गरदेव मोहला मौदा व २) सचिन वामनरावजी मोटघरे, वय ३४ वर्ष, रा. धामणगाव ता. मौदा जि. नागपूर यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या ५.५ ब्रास रेती किं. १६,५००/— रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण कि. १५,१६,५००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक प्रफुल रंधई पाक.स्टे. मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरिक्षक श्री मोहोड मो.क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.



२) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील रोहणा शिवार येथे दिनांक १५/०५/२०२२ चे १८.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान आरोपी क्रं. १) सुभाष गोविंदराव बावने(ट्रक चालक), वय ४० वर्ष, रा. वलनी, खापरखेडा, २) आजम मोहम्मद अली राईन(जेसीबी चालक), वय २२ वर्ष, रा. तट्टर लाईन वार्ड नं २ वलनी यांनी आरोपी क्र. ३) प्रशांत बहरूपी, रा. रोहणा याचे सांगण्यावरून रोहणा घाटाचे शेजारून एमएच—४०/पी— ०३७९ क्रमांकाची जे.सी.बी. मशीन चे साहयाने एमएच— ३१/सीबी— १८७७ क्रमांकाच्या ट्रकमध्ये विना रॉयल्टी एक ब्रास रेती कि. ३०००/—रू. ची लोड करून वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन १) एक ब्रास रेती कि. ३०००/—रू., २) एक ०६ चक्का ट्रक एमएच— ३१/सीबी— १८७७ कि. ४,००,०००/—रू. व ३) एक जेसीबी मशीन क्रं. एमएच— ४०/पी— ०३७९ कि. १०,००,०००/— रू. असा एकुण कि. १४,०३,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई नुमान शेख, पो स्टे. खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री कांकेडवार मो.नं. ८३२९६६६६७८ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. काटोल :— अंतर्गत १६ कि. मी. अंतरावरील मसखापरा येथे दिनांक १४/०५/२०२२ चे ०८:०० वा. दरम्यान **सौ अश्विनी रूपेश येडमे (मृतक), वय ३० वर्ष, रा. मसखापरा** ही गर्भवती असून ती घरातील बाथरूम मध्ये पाय घसरून पडली. तिला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल नागपूर येथे दि.१४.५.२२ चे १७.०० वा. नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. प्राप्त सुचनेवरून सदरचा मर्ग नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रदीप ठाकुर, मेयो पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री पार्थोडे मो नं. ७८७५६८३९२५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा सावरगाव येथे दिनांक १४/०५/२०२२ ते दिनांक १५/०५/२०२२ दरम्यान **अशोक सोमाजी पठाणे (मृतक), वय ५५ वर्ष, रा. अन्नाभाऊ साठे नगर, काटोल जि नागपूर** हे फिर्यादीचे काका असुन अती दारू पीण्याच्या सवईचे होते. मृतक हे अती दारूचे शेवन करून मरण पावले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शिवदार रमेश पठाणे, वय ३४ वर्ष, रा. अन्नाभाऊ साठे नगर, काटोल जि नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते मो.क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर